CMYK

**बार्शी–वैराग शहरातील मतदारांनी दिले सोपलांना पाठबळ**

पान ५ वर वाचा

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com | सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४ | वर्ष : २३ वे | अंक : ५७ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# मी.... ईश्वर साक्ष शपथ घेतो की...

# जिल्ह्यातून कोणत्या आमदाराला संधी?



- कल्याणशेट्टींसह देशमुखशाहीचं नावं आघाडीवर
- देवेंद्र कोठे या फ्रेश चेहऱ्याची देखील चर्चा
- नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीसांच्या मनात काय?

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**मंत्रिमंडाळाचा शपथविधी सोमवार (ता.२५) होण्याचे स्पष्टपणे संकेत आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर मुख्यमंत्रीपदाची मोहर उमटेल हे त्रिकालाबधीत सत्य मानलं जातंय. संभाव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या टीममध्ये सोलापूर जिल्ह्यातील कोणत्या आमदाराचा चेहरा असणार, यासबंधीचं औत्सुक्य अवघ्या सोलापूर जिल्ह्याला लागून राहिलं आहे. या विषयावर जिल्ह्यात सर्वत्र मायंदाळ पीक आलंय. अक्कलकोटचे आमदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी आणि सोलापूर शहर मध्यचा आमदारपदाचा फ्रेश चेहरा देवेंद्र कोठे हे देवेंद्र फडणवीस यांचं अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू आहेत. फडणवीस यांच्याकडून या दोघांपैकी एका नावावर मोहर उमटू शकते.**



देवेंद्र फडणवीस | सचिन कल्याणशेट्टी | देवेंद्र कोठे | विजयकुमार देशमुख | सुभाष देशमुख

शिवाय सिनिअर म्हणून आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख या दोघांची नावंदेखील मंत्रीपदासाठी चर्चेत आहे. मात्र, भाजप पर्यायानं युतीच्या मंत्रिमंडळात आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख या दोघांनाही संधी देण्यात आली असल्याने मंत्रीपदाचे ते तुलनेत एवढे प्रबळ दावेदार ठरु शकत नाहीत, अशी चर्चा खुद्द भाजपच्या गोटात आहे.

तथापि, असं जरी असलं तरी आमदार विजयकुमार देशमुख हे सलग पाचव्यांदा तर आमदार सुभाष देशमुख हे विक्रमी मताधिक्य घेऊन हॅट्रिक साधत तिसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्यामुळे या दोघांचाही मंत्रीपदासाठी विचार होऊ शकतो, असं मानलं जातंय. उल्लेखनीय बाब म्हणजे महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला साधारण २१ मंत्रीपदं येतील. तर दुसऱ्या बाजूला इच्छुकांची संख्या मोठी असणार आहे. तेव्हा कोणत्या जिल्ह्याची नाराजी न घेता संतुलन साधत मंत्रीपदं देणं हे मोठं आव्हान देवेंद्र फडणवीस यांच्यापुढं असणार आहे. प्राप्त परिस्थितीत सोलापूर जिल्ह्याच्याबाबतीत फडणवीस हे कोणता निर्णय घेणार, याबद्दल प्रचंड औत्सुक्य निर्माण झाले आहे. विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्ष किंवा आघाडी दोनशेहून अधिक जागा मिळविण्याचा प्रकार राज्यात तब्बल ५२ वर्षांनंतर घडला आहे. यापूर्वी १९७२ च्या निवडणुकीत असे घडले होते. यंदाच्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या महायुतीने दोनशेहून अधिक जागा मिळविण्याच्या इतिहासाची पाच दशकांनंतर पुनरावृत्ती केली आहे.

### सचिनदादांची आता बारी

आमदार सचिन कल्याणशेट्टी हे देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय आहेत. कल्याणशेट्टींच्या नावावर मंत्रीपदाची मोहर उमटविण्याचा विषय मागेच झाला आहे. मात्र, काही अडचणी आल्या. आता मुख्यमंत्री पदावर फडणवीस हे विराजमान झाल्यास त्यांच्या टीममध्ये आमदार कल्याणशेट्टी असू शकतात, मंत्रीपदाचे ते प्रबळ दावेदार आहेत. देवेंद्र फडणवीसांनी ठरविल्या कल्याणशेट्टींना 'लाल' दिवा मिळू शकतो.

### गडकरींचा वरदहस्त मंत्रीपदासाठी बापूंना ठरु शकतो भारी

भाजपमधील वजनदान नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतुकमंत्री नितीन गडकरी यांचा मोठा वरदहस्त आजवर आमदार सुभाष देशमुखांना राहिलेला आहे. सोलापूर जिल्ह्यात मंत्रीपद देण्याचा विषय होऊ लागल्यास गडकरी यांच्याकडे लॉबिंग आमदार सुभाष देशमुख करु शकतात. शिवाय मंत्री गडकरी हे देखील देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार सुभाष देशमुख यांच्या मंत्रिमंडळातील समावेशसंबंधी शब्द टाकू शकतात. आमदार सुभाष देशमुखांकडून गॉडफादर यांच्याकडे प्रयत्न होऊ शकतात.

**फक्त मंत्रिपदाचा भाजपचं विषय :** सोलापूर जिल्ह्यात भाजपनं ५ जागा जिंकत आपलं वर्चस्व राखलं आहे. त्या तुलनेत महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी पक्ष या दोघांचा एकही आमदार निवडून आलेला नाही. तेव्हा अजित पवार राष्ट्रवादी आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटातून जिल्ह्यात मंत्रीपद देण्याचा तसा विषयच राहात नाही. विषय आहे तो भाजपच्या कोट्यातून जिल्ह्याला मंत्रीपद देण्याचा. ते कोणाला दिले जाणार की मागच्या वेळेप्रमाणे मंत्रीपदाच्याबाबतीत जिल्ह्यावर अन्याय होणार, हे पाहावं लागेल.

### कुणाला किती मंत्रिपदं?

यात सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजपला सर्वाधिक म्हणजे २१ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १२, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे. या सूत्रावर प्राथमिक चर्चा झाली असून तिन्ही पक्षांचे मुख्य नेते दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करतील. त्यानंतर यामध्ये बदल होऊ शकतो.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पंधरासो की किमत तुम क्या जातो!






CMYK